महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे विभाजन व मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य यांची स्थापना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक : बीएलसी 1080/1167/वीस,
मंत्रालय, मुंबई 400032.
दिनांक 28 नोव्हेंबर, 1980.

संदर्भ :- 1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1060/के, दिनांकित 19 नोव्हेंबर, 1960.
2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1076/1008/वीस, दिनांकित 1 जून, 1977.
3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1076/1008/वीस, दिनांक 12 ऑक्टोबर, 1977.
4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1080/609/वीस, दिनांक 29 मे, 1980.
5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1080/609/वीस, दिनांक 28 ऑगस्ट, 1980.
6) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1377/261/वीस, दिनांकित 19 मार्च, 1979.
7) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1377/261/वीस, दिनांकित 30 ऑक्टोबर, 1979.

निर्णय :-- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1060/के, दिनांकित 19 नोव्हेंबर, 1960 अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली असून त्या मंडळाची वेळोवेळी पुनर्रचना करण्यात आली आहे. या मंडळाची शेवटची पुनर्रचना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1076/1008/वीस, दिनांकित 1 जून, 1977 व दिनांकित 12 ऑक्टोबर, 1977 अन्वये करण्यात येऊन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1080/609/वीस, दिनांक 28 ऑगस्ट, 1980 अन्वये मंडळास दिनांक 30 सप्टेंबर, 1980 पर्यंत मंडळास मुदतवाढ दिलेली होती. ती मुदत आता दिनांक 30 नोव्हेंबर, 1980 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

2. गेले काही दिवस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची पुनर्रचना करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळामध्ये प्रामुख्याने 1) मराठी विश्वकोशाचे संपादन व प्रकाशन आणि 2) मराठी वाङ्मय प्रकाशित करणे आणि / किंवा त्यांच्या प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान देणे अशी दोन प्रकारची कार्ये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीएलसी 1060/के, दिनांकित 19 नोव्हेंबर, 1960 अन्वये व त्यानंतर काढलेल्या वेगवेगळया आदेशान्वये सोपवली होती. शासनाच्या आता असे निदर्शनास आले आहे की, गेल्या वीस वर्षांत मंडळाच्या कार्यांची व्याप्ती खूपच वाढली असून मंडळाच्या कार्याचे विभाजन करणे आवश्यक झाले आहे. म्हणून प्रशासकीय कारणासाठी व [illegible]



३१०

विश्वकोशाच्या संपादन/प्रकाशन कार्यास गती व्हावी या दृष्टीने सध्याच्या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे विभाजन करुन त्याची दोन वेगवेगळी स्वतंत्र कार्यालये स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

3. त्यानुसार मराठी विश्वकोशाच्या संपादन च प्रकाशन कार्यार्थ "मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य" म्हणून नवीन कार्यालय दिनांक 1 डिसेंबर, 1980 पासून स्थापन करण्यात येत असून त्याचे मुख्यालय वाई, जि.सातारा येथे राहील. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे उपकार्यालय वाई येथील विश्वकोश कार्यालय त्यामुळे आता मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

4. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षस्थानी तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना द.म.रु.1000/- (रुपये एक हजार) फक्त इतके मानधन मंजूर करण्यात येत आहे.

5. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावर पुढील इतर सदसयांची 3 वर्षासाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

1. श्री. जी.व्ही.बेडेकर, मुंबई.
2. श्री. देवीसिंग चौहान, नांदेड.
3. श्री. के.ज.पुरोहित, प्राचार्य इस्माईल युसुफ कॉलेज, मुंबई.
4. डॉ. यु.म.पठाण.
5. प्रा. केशव मेश्राम.
6. प्रा. माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस
7. प्रा. व.र.आंबेरकर, मुंबई.
8. डॉ. वा.म.कुलकर्णी, मुंबई.
9. प्रा. एस. नईमुद्दिन, अमरावती.
10. श्री. मे. पुं. रेगे, मुंबई.
11. डॉ. सुभाष भेंडे, मुंबई.
12. श्री. स.आ.सप्रे, मुंबई.
13. श्री. राजाभाऊ कुलकर्णी, पुणे.
14. श्री. दिनेश देसाई, मुंबई.
15. श्री. द. य. राजाध्यक्ष, सचिव.

6. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावरील अशासकीय सदस्यांना मुंबई नागरी सेवा नियम, खंड 2 मधील परिशिष्ट XIII - A [ Section-I] नियम 1 [i] [b] व शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए 1477/1032/सी/एसइआर 5 दिनांकित 23 सप्टेंबर, 1977 मधील तरतुदीनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच त्या सदस्यांना दर दिवशी प्रत्येक बैठकीस रु.20/- (रु.वीस) फक्त इतका बैठक भत्ता देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

7. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या आस्थापनेवरील रु.1000-50-1500 या वेतनश्रेणीतील राजपत्रित वर्ग 1 मधील सचिवांचे पद त्या पदावरील अधिकाऱ्यांसह मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या आस्थापनेवर बदलण्यात येत असून मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सचिवपदी श्री. द. य. राजाध्यक्ष यांची बदलीने स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

8. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव यांना विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात येत असून वित्त विभागाने त्यानुसार मुंबई नागरी सेवा नियम, भाग दोन मधील परिशिष्ट 2 मध्ये योग्य ती नोंद घ्यावी.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीएलसी 1377/261/वीस, दिनांक 19/3/1979 व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीएलसी 1377/261/वीस, दिनांक 30/10/1979 मधील आदेश रद्द करुन मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सचिवांना आहरण व संवितरण अधिकारी ( Drawing & Disbursing Officer) म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच त्यांना नियंत्रण अधिकारी (Controlling Officer) म्हणून घोषित करण्यात येत आहे. विनामुज्य लेखनसामग्री व प्रमाणित फॉर्म्स मिळविण्यासाठी मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सचिवांचे नाव मुद्रण व लेखनसामग्री मॅन्युअल भाग 1 मधील परिशिष्ट III मध्ये व परिशिष्ट XIII मध्ये समाविष्ट करण्यात यावे.

9. " मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ " स्वतंत्र कार्यालय म्हणून स्थापन केल्यावर मराठी विश्वकोशाचे संपादन व प्रकाशन या कार्याव्यतिरिक्त इतर सर्व कार्ये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडे पूर्वीप्रमाणे चालू राहतील. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे मुख्यालय मुंबई येथे राहिल व मंडळाचा पुणे येथील भाषांतर विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा एक भाग म्हणून पूर्वीप्रमाणेच चालू राहील. पुनर्रचित महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची मुदत दिनांक 1 डिसेंबर, 1080 पासून तीन वर्षे राहील.

10. पुनर्रचित महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेंद्र शिवदास बारलिंगे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना दरमहा रु.1000/- (रुपये एक हजार) फक्त इतके मानधन मंजूर करण्यात येत आहे.

11. पुनर्रचित महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळावर पुढील इतर सदस्यांची 3 वर्षांसाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

1) श्री. महादेवशास्त्री जोशी, पुणे.
2) प्रा. अशोक केळकर, पुणे.
3) डॉ. विजया राजाध्यक्ष, मुंबई.
4) डॉ. वा.म.कुळकर्णी, मुंबई.
5) डॉ. उत्तम बाजीराव भोईटे, कोल्हापूर.
6) डॉ. मधुकर आष्टीकर, नागपूर.
7) श्री. घन:श्याम तळवटकर, मुंबई.
8) श्रीमती शिरीष पै. मुंबई.
9) श्री. शरदचंद्र मुक्तिबोध, नागपूर.
10) श्री. द. भि. कुळकर्णी, नागपूर.
11) श्री. नरहर कुरुंदकर, नांदेड.
12) श्री. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद.
13) श्री. व्यंकटेश माडगुळकर, पुणे.
14) प्रा. त्र्यं. कु. टोपे, मुंबई.
15) श्री. य. दि. फडके, मुंबई.
16) श्री. दया. पवार, मुंबई.
17) श्री. स. आ. सप्रे, मुंबई.
18) श्री. विंदा करंदीकर, मुंबई.
19) श्री. राजाभाऊ कुळकर्णी, पुणे.
20) श्री. रणजित देसाई, कोल्हापूर.

12. पुनर्रचित महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळावरील अशासकीय सदस्यांना मुंबई नागरी सेवा नियम, खंड 2 मधील परिशिष्ट XIII-- A [ Section-I] नियम 1 [i][b] व शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीआरए 1477/1032/सी/एसइआर 5 दिनांकित 23 सप्टेंबर, 1977 मधील तरतुदीनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच त्या सदस्यांना दर दिवशी प्रत्येक बैठकीस रु.20/- (रु.वीस) फक्त इतका बैठक भत्त देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

13. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या आस्थापनेवर रु.1000-50-1500 या वेतनश्रेणीतील राजपत्रित वर्ग 1 मधील सचिवांचे एक पद निर्माण करण्यात येत असून सुरुवातीला ते पद दिनांक 28 फेब्रुवारी, 1981 पर्यंत चालू ठेवण्यात येत आहे. या पदावरील नियुक्तीचे आदेश नंतर काढण्यात येतील.

14. याबाबतीत होणारा खर्च "278 कला व संस्कृती (क) कला व संस्कृती संचालन (1) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ - सामान्य प्रशासन विभाग" या अर्थशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व चालू वर्षासाठी केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

15. हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक 12511 एसएफडी, दिनांक 31/10/1980 अनुसार काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,
सही /-
( रा. दा. रणदिवे )
शासनाचे उपसचिव.

प्रति,
1) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
2) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
3) राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई.
4) मंत्री, राज्यमंत्री यांचे स्वीय सचिव / स्वीय सहाय्यक.
5) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
6) अध्यक्ष, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई, जि.सातारा.
7) सचिव, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई, जि.सातारा.
8) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
9) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य 1, मुंबई.
10) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य 2, नागपूर.
11) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
12) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
13) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
14) जिल्हाधिकारी, सातारा, सातारा.
15) कोषाधिकारी, सातारा, सातारा,
16) उप कोषाधिकारी, वाई, जि.सातारा.
17) तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी.
18) डॉ. सु. शि. बारलिंगे.
19) श्री. द. य. राजाध्यक्ष.
20) मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सर्व सदस्य (मंडळामार्फत)
21) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सर्व सदस्य (मंडळामार्फत)
22) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
23) वित्त विभाग, इएक्सपी-4.
24) सामान्य प्रशासन विभाग (14, 19, 22, 25)
25) सर्व मंत्रालयीन विभाग.
26) मुख्य संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.
27) निवड फाईल (2 प्रती).